DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते



## भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.७२/२०२०
## निशाणी क्र.१४ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवाला क्र.१ ने एकतर्फा आदेश रद्द करणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व अर्जदाराने दिलेले म्हणणे वाचले. सामनेवाला क्र.१ तर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. योगेश तेंडुलकर यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जदार व तर्फे वकील गैरहजर असल्याने त्यांनी अर्जास दिलेले म्हणणे त्यांचा युक्तीवाद म्हणुन ग्राहय धरण्यात आले.

०३. सामनेवाला क्र.१ चे कथन की, अर्जाकामी परिच्छेद निहाय तसेच वादातील विषयाबाबत अधिक माहिती मिळवुन सरकारी वकीलांसोबत चर्चा करणे गरजेचे होते. दरम्यान काही महत्वाची कागदपत्रे उशीरा प्राप्त झाल्यामुळे त्यांना दाव्यात वेळेत हजर होऊन कैफियत देता आली नाही. सामनेवाला क्र.१ शासनातर्फे कैफियत दाखल न झाल्यास शासनाचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, बचावाची संधी द्यावी अशी विनंती केली.

०४. अर्जात दिलेली कारणे ही खोटी व बनवाबनवीची असल्याचा आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

०५. सामनेवाला क्र.१, अर्जदार यांचा अर्ज, म्हणणे व युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुत अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.१ व अर्जदार यांचे प्रस्तुत वादामध्ये आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याचे स्पष्ट होते. सामनेवाला क्र.१ ने अर्जात हजर होऊन मुदतीत कैफियत का देता आली नाही, याबद्दल दिलेले अर्जामधील कारण संयुक्तीक

आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.१ ला त्याची बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. सामनेवाला क्र.१ विरुध्द दिनांक ३०/०६/२०२२ रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जाचा निकाल गुणदोषावरुन उभय पक्षातील वादाला पुर्णविराम मिळेल. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ विरुध्द दिनांक ३०/०६/२०२२ रोजी पारित झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो व अर्जास कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

PRAVIN MOHANRAO UNHALE
Digitally signed by PRAVIN MOHANRAO UNHALE
Date: 2023.09.15 11:40:10 +0530

महाड
दिनांक १४/०९/२०२३

(**पी. एम. उन्हाळे**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड